दै. सत्यप्रभा दि. 16.11.25

## दुकानात घेरून निर्घृण हत्या, तीन तासांत आरोपी जेरबंद

# १६ वर्षांपूर्वीच्या हत्येचा सूड!



प्रतिनिधी। **नांदेड**

सुमारे १६ वर्षांपूर्वी झालेल्या वडिलांच्या हत्येची रक्तखूण मनात जपलेल्या एका तरुणाने शेवटी सूड उगवत नांदेड शहरालगतच्या बळीरामपूर पंचशीलनगरमध्ये एका व्यक्तीची निर्घृणपणे हत्या केली. शुक्रवारी सायंकाळी सातच्या सुमारास घडलेल्या या अंगावर काटा आणणाऱ्या घटनेने बळीरामपूर परिसर हादरून गेला. धक्कादायक बाब म्हणजे, हत्येचा सपशेल कट रचणारे तिघेही आरोपी केवळ १९ ते २० वर्षे वयोगटातील तरुण असून ग्रामीण पोलिसांनी अवघ्या तीन तासांत या हत्येचा उलगडा करून आरोपींना जेरबंद केले.

या घटनेत मृत झालेला राष्ट्रपाल कपाळे (वय ३९, रा. पंचशीलनगर) हा २००९ मध्ये झालेल्या एका खून प्रकरणात आरोपी होता. त्यावेळी झालेल्या हत्येत राजेंद्र गवळे या व्यक्तीचा मृत्यू झाला होता. या प्रकरणात राष्ट्रपालसह इतरांना आरोपी ठरविण्यात आले होते. मात्र, न्यायालयीन प्रक्रियेनंतर राष्ट्रपाल आणि त्याचे दोन साथीदार निर्दोष मुक्त झाले. सुटल्यानंतर तो ऑटो चालक म्हणून काम पान २ वर